# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.01.2026** **वार- बुधवार**

---

**अवयवदान**

राज्यात अवयवदानात पुणे विभागानं आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षी राज्यात 153 जणांचं मरणोत्तर अवयवदान करण्यात आलं. त्यातील 79 जण पुणे विभागातील असून, त्यातून 207 गरजू रुग्णांना जीवदान मिळालं. मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुस, हृदय, अशा अवयवांचा त्यात समावेश होता. अवयवदानाबाबत जनजागृती वाढत असून त्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवसंजीवनी मिळत आहे. यावर्षी ऑस्ट्रेलियातून सुटीनिमित्त भारतात आलेल्या महिलेचा मृत्यू झाल्यानंतर, तिच्या नातेवाईकांनीही अवयवदानाचा निर्णय घेतला होता. त्यातून अवयवदानाबाबत जागतिक पातळीवर असलेली जागरूकताही समोर आली, अशी माहिती पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी दिली.

**दिव्यांग**

दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी हक्काधिष्ठित आणि संशोधनावर आधारित समावेशक शिक्षण देण्याची सामूहिक बांधिलकी महत्त्वाची असून याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे, असं प्रतिपादन राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी आज पुण्यात केलं. नॅशनल कन्व्हेन्शन ऑफ एज्युकेटर्स ऑफ द डीफ आणि मुंबईची अली यावर जंग राष्ट्रीय वाणी आणि श्रवण दिव्यांगजन संस्था यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या 'दिव्यांगतेच्या दृष्टिकोनातून आणि संशोधनाच्या आधारे समावेशक शिक्षण' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या परिषदेत देशभरातून सुमारे साडे-तीनशे प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला, त्यामध्ये नामवंत शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, धोरणकर्ते, पुनर्वसन क्षेत्रातील तज्ज्ञ, शिक्षक तसंच विविध विषयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचं अनावरण करण्यात आलं.

**उद्यान**

पुणे महानगरपालिकेच्या पु.ल. देशपांडे उद्यानासह ओकायामा मैत्री उद्यानाच्या निर्मितीला दोन दशकं पूर्ण झाल्यानिमित्त जपानमधील ओकायामा शिष्टमंडळानं आज उद्यानाला सदिच्छा भेट दिली. यावेळी उद्यानात केक कापून द्वीदशकपूर्ती साजरी करण्यात आली. यानंतर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते ओकायामा शिष्टमंडळाचं, स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आलं. यातून पुणे–ओकायामा मैत्रीचे दृढ संबंध पुन्हा अधोरेखित झाले.

**यादी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं आपल्या शहरातील नागरिकांना मतदार यादीमधील आपलं नाव आणि मतदान केंद्र शोधण्याबाबत मनपा संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. प्रभाग क्रमांक आणि अनुक्रमांक याबरोबरच मतदान केंद्राचा संपूर्ण पत्ता ठळकपणे लाल रंगात दिला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मतदारांना मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या संबंधित लिंकवर ही सुविधा उपलब्ध असणार आहे.

**संकल्प**

पुणे शहरात जमिनीखालून रस्त्यांचं जाळ उभारण्यासंदर्भात यापूर्वी चाचपणी झाली होती. आता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून हे प्रश्न यापुढे सोडवावे लागतील असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुणे शहर कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं.

पुणे महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे आज संकल्पपत्र जाहीर करण्यात आलं. यात मेट्रो, विमानतळ विस्तार, बस खरेदी, टाऊनशिप प्लॅनिंग इत्यादी आश्वासनं देण्यात आली आहेत. खासदार मुरलीधर मोहोळ, आमदार चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ यावेळी उपस्थित होते.

500 चौरस फुटापेक्षा कमी आकाराचं घर असणाऱ्या, आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना मिळकत कर माफ करणार, 75 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना पी एम पी एम एल चा मोफत प्रवास, तीस वर्षांवरील प्रत्येक पुणेकराची मोफत वार्षिक आरोग्य तपासणी, महिलांना सवलतीच्या दरात मेट्रो आणि पीएमपी बस प्रवास, इत्यादि आश्वासनं या संकल्पपत्रात देण्यात आली आहेत.

**पिंपरी चिंचवड प्रचार**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी आज शहरातील गृह संकुलांमध्ये जाऊन थेट भेटी देऊन प्रचार केला. नाशिक फाटा ते मोशी नाशिक महामार्ग, महामार्ग रेल्वे लाईन, नदीवरून जाणारा सेंट मदर टेरेसा उड्डाणपूल, सायन्स पार्क, ऑटो क्लस्टर या विकास कामांची माहिती नागरिकांना देत उमेदवारांनी शहरातील नागरिकांचं जीवन अधिक सुखकर करण्यासाठी प्रयत्नशील राहू असा विश्वासही मतदारांना दिला. शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 118 जागा लढवत आहे. यापैकी आज सकाळच्या सत्रात पन्नास उमेदवारांनी फेरी काढत गृह संकुलांना भेटी दिल्या.

**स्पिफ**

आरोग्य सेनेतर्फे येत्या दहा आणि अकरा तारखेला बारावा 'स्पिफ' अर्थात 'स्मिता पाटील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या लघुपट महोत्सवात जगभरातील प्रतिभावंतांचे लघुपट पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे, अशी माहिती आरोग्य सेनेतर्फे प्रसिध्दी पत्रकाव्दारे देण्यात आली आहे. सर्वांसाठी विनामूल्य खुला असलेला हा महोत्सव सकाळी 9 ते सायंकाळी 7 या वेळेत पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात होणार आहे. या दोन दिवसांत अंतिम फेरीसाठी निवडण्यात आलेले, 27 भारतीय आणि 20 परदेशी, असे 47 लघुपट दाखवण्यात येणार आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**